Disclaimer : This content is not created or owned by Info Edge (india) Limited

DAY — 22 SEAT NUMBER

2024 | III | 19 1100 **J-986** (M)

# SOCIOLOGY (45)

Time : 3 Hrs. (7 Pages) Max. Marks : 80

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) प्रश्नांच्या उजवीकडे पूर्ण गुण दिलेले आहेत.

(३) चार गुणांसाठी विचारलेल्या उपप्रश्नांच्या उत्तरांत किमान चार मुद्दे अपेक्षित आहेत.

(४) प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

**प्र. १. खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा :** [ २० ]

(अ) खालील कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व ती पुन्हा लिहा : (५)

(१) 'बेल बजाओ आंदोलन' -------- या सामाजिक समस्येशी निगडित आहे.

[ कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, कुपोषण ]

(२) 'वसुंधरा दिन' ------ या दिवशी साजरा केला जातो.

[ ५ जून, ११ जुलै, २२ एप्रिल ]

(३) ----- यांच्या मते भारतीय लोकसंख्येचे सहा प्रमुख वंश आधारित गट पडतात.

[ डॉ. जी. एस घुर्ये, बी. एस. गुहा, डॉ. इरावती कर्वे ]

0986



P.T.O

shiksha

(४) ----- हा शहरी विकास कार्यक्रम आहे.

[स्मार्ट सिटी मिशन, सर्व शिक्षा अभियान, पंचायत राज ]

(५) हिंदू कोड बिल ----- यावर्षी पारित झाले.

[१९४८, १९५२, १९५५]

**(ब) खालील जोड्यांपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून ती पुन्हा लिहा :** (५)

(१) (i) स्वामी दयानंद सरस्वती — आर्यसमाज

(ii) पेरियार — सेल्फरिस्पेक्ट मूव्हमेंट

(iii) महात्मा गांधी — हरिजन सेवक संघ

(iv) बेहरामजी मलबारी — धर्मसभा

(२) (i) बहुजिनसीपणा — शहरी समुदाय

(ii) पंचशील — डॉ. राजेंद्र प्रसाद

(iii) जात — अर्पित दर्जा

(iv) कायदा — औपचारिक नियंत्रण

(३) (i) 'सेवन सिस्टर्स' — ईशान्येकडील सात भगिनी प्रदेश

(ii) शांततापूर्ण सहनिवासा करिता — राष्ट्रीय एकात्मता

(iii) गृहभाषा — मातृभाषा

(iv) संप्रदायवाद — जातसंघर्ष

shiksha

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (४) | (i) | श्रमकेंद्री उत्पादन | — | औदयोगिकीकरण |
| | (ii) | औदयोगिक विस्तार | — | शहरीकरण |
| | (iii) | तर्कनिष्ठ दृष्टिकोन | — | अंकीकृतकरण |
| | (iv) | उदारतावादी तत्त्व | — | जागतिकीकरण |
| (५) | (i) | दारू | — | आंतरजाल व्यसन |
| | (ii) | अपर्याप्त कौशल्य | — | बेरोजगारी |
| | (iii) | कर्जबाजारीपणा | — | शेतकऱ्यांच्या आत्महत्या |
| | (iv) | दादा-दादी | — | एनजीओ |

**( क )** चौकटीत दिलेल्या पर्यायांतून योग्य संज्ञा ओळखून त्या दिलेल्या विधानांपुढे पुन्हा लिहा : (५)

| |
|---|
| भाषावाद, अंतर्विवाही, शहरीकरण, औदयोगिकीकरण, महात्मा ज्योतिराव फुले, अमली पदार्थ |

(१) बालविवाह प्रतिबंधनासाठी कार्य केले.

(२) भाषेवर आधारित संघर्ष.

(३) आपल्याच समूहातील वधू किंवा वर निवडणे.

(४) याच्यामुळे शारीरिक अस्वास्थ्याच्या समस्या येऊ शकतात.

(५) यंत्राद्वारे होणाऱ्या उत्पादनात वाढ.

**( ड )** अधोरेखित शब्द दुरुस्त करून विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) हिंदू धर्मातील अंतिम उद्दिष्ट <u>अर्थ</u> आहे.



P.T

shiksha

(२) शहरी भागातील मुख्य व्यवसाय शेती आहे.

(३) आर्य समाजाची स्थापना राजर्षी शाहू महाराज यांनी केली.

(४) जागतिक अर्थव्यवस्थेमुळे आपण स्वावलंबी झालो आहोत.

(५) 'स्टार्ट अप इंडिया' ही योजना वृद्धांच्या समस्या सोडविते.

**प्र. २. खालील विषयांवर संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही दोन ) :** [८]

(१) पूर्व वैदिक काळातील भारतीय स्त्रियांचे स्थान

(२) राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील अडथळे

(३) आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये

**प्र. ३. खालील मध्ये फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** [१

(१) ख्रिस्ती धर्म व इस्लाम धर्म

(२) आदिवासी समुदाय आणि ग्रामीण समुदाय

(३) अंकीकृतकरण आणि जागतिकीकरण

(४) सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ

(५) पारंपरिक स्त्री आणि आधुनिक स्त्री

**प्र. ४. खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा ( कोणतेही दोन ) :** [८


(१) महिला सबलीकरण

(२) वर्णव्यवस्था

(३) औद्योगिकीकरण

shiksha

प्र. ५. (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा : (४) [१२]




(ब) खालील विधाने सत्य की असत्य आहेत हे कारणे देऊन सांगा (कोणतेही दोन): (८)

(१) पर्यावरणीय चळवळ व्यापक आहे.

(२) आर्थिक विषमतेचा समाजावर परिणाम होत नाही.

(३) वर्तमान काळ हा संगणकीकरणाचा आहे.

प्र. ६. (अ) खालील उतारा वाचून त्या खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (६) [१०]

सर्व शिक्षा अभियान (SSA) हा भारत सरकारचा कार्यक्रम आहे. यामध्ये ६ ते १४ या वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९३-९४ मध्ये पुढाकार घेतला- त्यानंतर २०००-२००१ मध्ये हा कार्यक्रम पूर्णत: कार्यरत झाला. या कार्यक्रमामध्ये शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला गेला.



shiksha

याबरोबरच १५ ऑगस्ट १९९५ मध्ये भारत सरकारने 'प्राथमिक शिक्षणासाठी पोषण आधार राष्ट्रीय कार्यक्रम' (National Programme of Nutritional Support to Primary Education, NP-NSPE) राबविला. तेव्हापासूनच शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी मोफत 'मध्यान्ह भोजन' ही संकल्पना अस्तित्वात आली, जी ग्रामपंचायत आणि नगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्थाकरवी राबविली जाते. मुलांना मध्यान्ह भोजन देणे सक्तीचे आहे. यामध्ये दररोज उत्तम आणि पोषक जेवण मुलांना देणे आवश्यक आहे असे मानले आहे. बऱ्याच संस्थांनी जेवण बनविणे व वेळेत शाळेत पोहचविणे हे काम हाती घेतले.

सार्वत्रिक शिक्षण आणि पोषण एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. गावांतील आणि नगरपालिकेच्या शाळांमधील मुले या भोजनाची वाट पाहत असतात. बऱ्याचदा हा आहारच त्यांच्या साठी दिवसभराचा मुख्य आहार असतो.

प्रश्न :

(१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे तुम्हांला आवश्यक वाटते का?

(२) प्राथमिक शिक्षणात 'मध्यान्ह भोजनाचे' काय महत्त्व आहे?

(ब) आपले व्यक्तिगत मत नोंदवा (कोणतेही <u>एक</u>) : (४)

(१) जैन आणि बौद्ध धर्मांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली.

(२) वृद्धाश्रमांचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम आहेत.

shiksha

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे सविस्तर उत्तर १५० ते २०० शब्दांमध्ये लिहा : [१०]

(१) शहरी समुदायाच्या समस्या स्पष्ट करा. त्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचवा.

(२) शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे स्पष्ट करा. ही समस्या सोडविण्यासाठी तुम्ही काय उपाय सुचवाल?

◆◆◆

shiksha

shiksha